
९१ वे

# अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन

रत्नागिरी

दिनांक : २५ जाने. ते ३० जाने. २०११





अध्यक्षीय भाषण :

## श्री. राम जाधव

अखिलभारतीय मराठी नाट्यपरिषद, मुंबई

**रसिक मित्रांनो ! नमस्कार !!**

कोकणच्या ह्या निसर्गसंपन्न अशा भूमीत हौशी रंगभूमीचा नाट्यधर्मी, रंगकर्मी आपल्या सगळ्यांना नमस्कार करतोय. मित्रहो! आजचं हे संमेलनाध्यक्षपद अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई द्वारा अनपेक्षितपणे मला मिळालं त्याबद्दल मी परिषदेचा आभारी आहे. खरं तर आजपर्यंत प्रकाशझोतात असलेली मंडळीच आपण नाट्य संमेलनाध्यक्षपदी दिलीत. हौशी रंगभूमीच्या रंगकर्मीवर प्रकाशकिरणे फार कमी पडतात. पण माझ्यावर मात्र प्रकाशझोताऐवजी (Spot) प्रकाशाचा लोळच (सोलर) येऊन पडला. आयुष्यभर मी हौशी रंगभूमीचा पाईक असल्यामुळे ह्या रंगभूमीसंबंधीच्या सुख दुःखात मी आयुष्य घालवलंय.

आपल्या पैकी बहुतेकांना राम जाधव कोण? हे ठाऊक नसेल, तशी अपेक्षाही नाही. रंगभूमीवर आयुष्यभर हौसेने कार्य करणारा आणि विदर्भात 'रसिकाश्रय' ह्या नाट्यसंस्थेची स्थापना करुन तिला पन्नाशीपर्यंत पोहोचविणारा मी एक रंगकर्मी! गेल्या ५० वर्षात संस्थेद्वारा विविध प्रकारची नाटके, मुख्यत्वेकरुन प्रायोगिक नाटके ते (वैचारिक) शिबिरे, नाट्य संम्मेलन, परिसंवाद, नाट्यप्रशिक्षण शिबिरे, तज्ञांच्या संस्थेला भेटी, त्यांची व्याख्याने, विदर्भातील गाव खेड्यापर्यंत जाऊन महाराष्ट्र शासनाची एका महिन्याची आणि संस्थेद्वारा १०-१० दिवसांची नाट्यप्रशिक्षण शिबिरे, एक प्रशिक्षक म्हणून घेत आलो आणि संपूर्ण विदर्भातच नव्हे तर महाराष्ट्रातील इतरही भागात नाट्य चळवळ अधिकाधिक रुजविण्यासाठी अथक प्रयत्न केले. परिणामी महाराष्ट्र शासनाने कलादान पुरस्कार आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबईने कृतज्ञता पुरस्कार देऊन मला गौरविले.

अनेक पुरस्कार आणि सत्कार झाले पण मी त्यात रमलो नाही. आजही वयाची पंच्याहत्तरी ओलांडल्यावरही कै. तात्यासाहेब शिरवाडकरांचे

विश्वविख्यात नाटक 'नटसम्राट' ह्याचे संक्षिप्तीकरण करुन 'संक्षिप्त मी नटसम्राट' ह्या नावाने आजपर्यंत दिल्ली, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, भंडारा, यवतमाळ, अकोला, चाळीसगाव आदी ठिकाणी १७ प्रयोग सादर केले.

५ वीत असताना Only 2 marks ही नाट्यछटा सादर केली आणि शाळेने मला प्रथम क्रमांक दिला. तिथूनच माझा नाट्यप्रवास सुरु झाला. ११ वी पर्यंत एकांकिका, ५ नाटके, त्यात स्त्री भूमिका. नंतर नोकरीसाठी मुंबई, मुंबईत सर्वच नाट्यगृहांचे आकलन. जिथे जिथे नाट्यशाळा आहेत त्या त्या ठिकाणी जाऊन नाट्यशास्त्रावरील मिळतील ती पुस्तके घेऊन नाट्यशास्त्राचा अभ्यास केला. १९६० साली मुंबईहून बदली होऊन अकोल्यात आलो नि उत्कृष्ठ कलावंत शाहू मोडक यांच्या हस्ते माझ्या 'रसिकाश्रय' ह्या नाट्यसंस्थेचे उद्‌घाटन केले. ह्या ५० वर्षात राज्यनाट्य स्पर्धेत सातत्याने सहभाग घेऊन अनेकदा प्रथम पारितोषिके, अभिनय, दिग्दर्शनाची प्रथम पारितोषिके, सतत २६ वर्षे नाट्य स्पर्धांचा परीक्षक म्हणून कार्य, शासकीय शिबिरांचा प्रशिक्षक, असंख्य नाटकांचा दिग्दर्शक, दक्षिणमध्य सांस्कृतिक केंद्र, नागपूरचा कार्यक्रम समिती सदस्य व १९८६ आणि १९८९ च्या 'अपना उत्सवा'तील कै. मा. श्री. राजीव गांधी ह्यांनी आयोजिलेल्या कलात्मक कार्यक्रमात सहभाग, रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचा गेली अनेक वर्षापासून सदस्य म्हणून कार्यरत. अकोला जिल्हा वृध्द कलावंत व साहित्यिक निवड समितीचा अध्यक्ष असताना १८२ वृद्ध कलावंतांना मानधन देण्याची शिफारस करुन ते त्यांना शासनातर्फे मिळवून दिले. हे सर्व करीत असतांना नोकरी आणि नाटक सांभाळून बी.ए.एल.एल.बी. (बार कौन्सिल) आणि हिंदी साहित्य विषारद हा शिक्षणाचा भागही पूर्ण केला. पण वकिलीची प्रॅक्टीस करण्यापेक्षा विदर्भातील खेड्यापाड्यातील आणि तालुका स्तरावरील तरुणांना नाट्य चळवळीत ओढून त्यांचेकडून नाटकाची प्रॅक्टीस

करुन घेणे महत्वाचे वाटल्याने वकिली केली नाही.

हे सर्व मी अकोल्यात आणि ज्या विदर्भात केले तो विदर्भ पूर्णपणे नाट्यमय आहे. या विदर्भात कालीदास, भवभूती, भास यांचा मुक्काम असल्याचे पुरावे आहेत.

'तात्या! ती एक तलवार तुमची, बाकी विळे, कोयते' असे कवि गोविंदाग्रजांनी ज्यांच्याबद्दल म्हटले ते नाटककार श्रीपाद कृष्ण कोल्हटकर विदर्भाचेच. १०० ते १२५ वर्षापूर्वी अमरावती जिल्ह्यातील एलिचपूर या तालुक्यात ५२ एक्का आणि एक्कीसी या नावाची दोन नाट्यगृहे होती. ह्या काळी येथे नाटकं होत असल्याचा तो भरभक्कम पुरावा आहे. आज ह्या नाट्यगृहांचे फक्त भग्नावशेष शिल्लक आहेत. ह्याकडे पुरातत्व विभाग अथवा महाराष्ट्र शासनाने लक्ष दिल्यास ह्या सांस्कृतिक धनाचे जतन होईल. शिरोळे नावाच्या एका गृहस्थाने ह्याच काळात नाटके लिहिलीत पण त्यांची हस्तलिखिते सापडत नाहीत.

विदर्भाने हौशी रंगभूमी १२५ वर्षापर्यंत जगविली. ह्याच विदर्भात दंडार ही तमाशा प्रधान लोककला खडी गम्मत, लप्पक, खम (आदिवासी लोककला) सोंग ही नाटकाचीच त्याकाळची रुपे होत आणि विदर्भाच्या ह्या प्रसिध्द लोककलाही आहेत. ह्या संबंधी डॉ. हरिश्चंद्र बोरकर आणि प्रा. म.ना.लोही ह्यांची येथील प्रसिध्द अशा झाडीपट्टीच्या रंगभूमीवर पुस्तकेही प्रसिध्द आहेत. अकोल्याचे विष्णू मोरेश्वर महाजनी ह्यांनी शेक्सपीअरच्या तीन नाटकांचा अनुवाद केलेला आढळतो. कै. रामचंद्र बजाबा प्रधान ह्यांनी शेक्सपीअरच्या एका नाटकाचा 'भ्रांतीकृत चमत्कार' हा अनुवाद केला आहे. कै. राम गणेश गडकरी ह्यांनी आपले अखेरचे दिवस सावनेर येथील त्यांचे वडीलबंधू ह्यांचेकडे घालविले आणि तेथेच त्यांनी आपला देह ठेवला. सावनेरला गडकरी स्मारकाची स्थापना करण्यात आली आहे.

१९३१ ते १९५५ हा कालखंड मराठी रंगभूमीला वाईट काळ होता. परंतु ह्याही काळात कृ. बा. भोसले नावाचे एक नाटककार नाटके लिहितच होते. नागपूरचे नाना जोग, मलकापूरचे पु. भा. भावे ह्यांचीही नाटके त्यावेळी प्रसिध्द होती. भावे नाट्यसंमेलनाचे अध्यक्षही होते. बाळ शास्त्री वाशीमकर ह्यांनी बालगंधर्वांच्याच काळात 'संगीत सौभद्र' हे नाटक मुंबईपर्यंत नेऊन त्याचे प्रयोग केले. २८ ऑगस्ट १९०५ रोजी मुंबई येथे झालेल्या पहिल्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष कै. दादासाहेब खापर्डे होते. तसेच अनंत वामन बर्वे यांनी त्याकाळी विस्कळीत झालेल्या मराठी रंगभूमीला वाट दाखविण्यासाठी संमेलनाची कल्पना मांडली. दादासाहेब खापर्डेनी ती उचलून धरली नि काही तज्ञ व्यक्तींनी मिळून 'अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदे'ची स्थापना केली. ह्यात दादासाहेब खापर्डेंचा महत्वपूर्ण वाटा होता. दादासाहेब खापर्डे, मोरोपंत जोशी, वीर वामनराव जोशी, नानासाहेब बामणगावकर, तात्यासाहेब मुधोळकर आणि पुरुषोत्तम दारव्हेकर ही नाट्य संमेलानाध्यक्षपदी त्याकाळी विराजमान झालेली मंडळी होत.

लोककलेचे अभ्यासक डॉ. मधुकर वाकोडे, व-हाडी भाषेत नाटके का होत नाहीत ? असा सवाल करणारे डॉ. विठ्ठल वाघ विदर्भाचेच. कारण त्यांचे मते या भाषेतील नागपूरी व-हाडीतील 'व-हाडी माणसं', उद्धवजी शेळके ह्यांच्या कादंबरीवर आधारित 'पोहा चालला महादेवा ' आणि विठ्ठल वाघांचे 'अंधार यात्रा' ही तीनच नाटके झाल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे. ह्याशिवाय आणखीही काही नाटके झाली असतील.

एकांकिका ह्या नाट्यप्रकारात विश्वविख्यात नाटककार प्रा. महेश एलकुंचवार हे नाव हटकून घेतले जाते. त्यांच्या एकांकिका विजया मेहता सारख्या दिग्दर्शिकेने बसविल्या नि अनेक आव्हानात्मक समस्या आपल्या नाटकाद्वारे समाजासमोर मांडल्या. ती नाटके प्रसिद्धही झालीत नि प्रेक्षकांना भावलीसुध्दा, एलकुंचवारही नागपूरचेच, विद्याधर गोखले तर मूळ अमरावतीचेच, त्यांच्या

संगीत नाटकांनी एक काळ वाजत गाजत ठेवला. कै. प्रा. मधुकर अष्टीकरांचे 'ज्ञानीयाचा राजा' हे बालनाट्य, दिनकर देशपांडे, पुरुषोत्तम दारव्हेकर, चंद्रशेखर व-हाडपांडे, अरविंद जाहागीरदार, प्रभाकर पुराणिक व इतर ह्यांची काही बालनाट्य नागपूरच्या पेंडसे, जाहागीरदार आदी मंडळींनी बसविली. ही सर्व मंडळी वैदर्भिय.

दलित रंगभूमीची सुरुवातही श्री. प्रभाकर दुपारे ह्यांच्या 'सातासमुद्रापलिकडे' ह्या नाटकाने, तसेच जीवने, रामटेके आणि इतर काही मंडळींनी विदर्भात प्रामुख्याने नागपूरात भरीव कार्य करुन विदर्भात दलित नाट्य चळवळ जागृत ठेवली. आजही डॉ. बाबासाहेबांच्या जीवनावर महानाट्चे सादर केली जातात. मिलिंद महाविद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य द. भी. चिटणीस ह्यांनी लिहिलेल्या 'युगयात्रा' या नाटकाचा प्रयोग धर्मपरिवर्तनाचे दिवशी नागपूर येथे ६ लाख प्रेक्षकांच्या समोर सादर केल्याचे उदाहरणही विदर्भाचेच.

विदर्भात पथनाट्याची सुरुवात ही नागपूरचे श्रीपाद जोशी, प्रभाकर दुपारे, अरविंद विश्वनाथ (अकोला) यांनी केली. विदर्भात श्री. रु. पां. पांजणकर, खंडेराव जोशी आणि प्रा. म.न. लोही ह्यासारखे अभ्यासू समीक्षकही आहेत. नागपूरच्या प्रतिभा कुळकर्णी ह्यांनी संशोधन करुन 'विदर्भातील नाटककार' हा जो ग्रंथ प्रसिद्ध केला त्यात जवळपास २०० नाटककार आज विदर्भाच्या कानाकोप-यात नाटके लिहित आहेत. झाडीपट्टीतील रंगभूमी हा एक स्वतंत्र विषय आहे. तोही विदर्भाचाच! त्याचप्रमाणे वैदर्भीय व-हाडी लेखक पुरुषोत्तम बोरकर ह्यांच्या कादंबरीवर आधारित 'मेड इन इंडिया' हा एकपात्री सादर करणारे दिलीप देशपांडे, 'रमाई' सादर करणा-या सौ. शोभना मोहरिल, तसेच सौ. शेल जैमिनी व इतर हे सर्व विदर्भाचेच. ह्या सर्व नाटकांमध्ये हौसेने भूमिका करणा-या स्त्री कलावंतही विदर्भाच्याच. ह्याशिवाय नाटकात गाजले त्यांची नावे आपण जाणताच. मात्र सिने अभिनेत्री लीला चिटणीस, स्नेहप्रभा प्रधान, सुमती गुप्ते ह्या

विदर्भकन्या आहेत हे मात्र नावानिशी सांगतो. अशा ह्या नाट्यसंपन्न विदर्भात माझा जन्म झाला हे माझे भाग्य समजतो आणि मराठी रंगभूमीचं लेणं असलेल्या वै बालगंधर्वांवर झालेलं कर्ज फेडण्यात देखील ह्याच विदर्भाने मदत केलेली आहे, ह्याचा मला अभिमान आहे.

अशा ह्या श्रीमंत विदर्भातून बाहेर पडून एकूणच रंगभूमीचा विचार केल्यास असे आढळून येते की मराठी रंगभूमीचे अनेक पदर व प्रवाह आहेत. प्रत्येकाचे वेगळेपण आहे व ते ठळकपणे दिसतदेखील आहे.

व्यावसायिक रंगभूमी मुंबई व पुण्यातच ठाण मांडून बसली आहे. ती नाट्यव्यवसायाची बाजारपेठच आहे. हौशी रंगभूमीच्या कलावंताना तिकडे जाण्याचे आकर्षण आहे. पण अडचणीही तशाच आहेत. ह्याच्या अगदी उलट हौशी रंगभूमी महाराष्ट्राच्या कानाकोप-यात पसरली आहे. बोलपटांच्या सुरुवातीला त्याकाळी व्यावसायिक रंगभूमीची झालेली दैनावस्था सुरळीत करण्यासाठी तत्कालीन नाट्यधुरंधरांनी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई ची स्थापना करत मराठी रंगभूमीला वळण देण्याचा प्रयत्न केला, हे सर्वश्रुतच आहे. पण आज ह्या परिषदेच्या आणि शासनाच्या समोर संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलेल्या हौशी रंगभूमीच्या अडीअडचणी समजावून घेऊन हौशी रंगकर्मी आणि हौशी रंगभूमीला स्थिरत्व कसे येईल ह्याचा विचार करणे आवश्यक झाले आहे. महाराष्ट्राच्या सर्वच प्रादेशिक विभागात हौशी नाट्यसंस्था आपल्या आत्मतुष्टीसाठी नाटक करताना दिसतात. त्यांना खूप अडचणी येतात, त्याचा पाढा वाचत बसत नाही. चांगली संहिता न मिळणे, डी.आर.एम.नं., लेखकाची परवानगी, तालीम हॉल, स्त्रीपात्र न मिळणे, नाट्यगृहाची भाडी, पेंटींग, प्रसिद्धी, तिकीट विक्री एवढे करुनही प्रेक्षकांचा अल्प प्रतिसाद, त्यामुळे आर्थिक गणित बिघडणे नि त्याचा सादरी करणावर परिणाम होणे इ.

शासनाच्या राज्यनाट्य स्पर्धा ह्या अडचणींवर उपाय म्हणून शासनाने सुरु

केल्या. कामगार कल्याण मंडळाने देखील कामगारांसाठी हा उपाय केला, पण ह्याचा वापर आमचे कलावंत किती करतात ? त्यातून काय निष्पन्न होतं ? किती नवीन नाटककार, दिग्दर्शक, तंत्रज्ञ, नट ह्यातून अभ्यास करुन बाहेर पडतात ? अलिकडच्या काळात किती नामवंत नट रंगभूमीला मिळाले ? हे प्रश्न आज उभे ठाकले आहेत.

ह्या सर्व प्रदेशातील नाटक मंडळींना एकत्र आणून ह्या सर्व विभागांचा सर्व्हे करुन कुठल्या हौशी संस्था सातत्याने नाट्यनिर्मिती करीत आहेत ? त्यात किती नवीन संहिता सादर होतात ? की व्यावसायिक नाटकांची नक्कल करण्यातच ते बिझी आहेत ? हे बघायला हवे. हौशी संस्था खरोखर काही नवीन करतात का ? परिणामांना झुगारुन देऊन सादरीकरणातून वैचारिक विद्रोह किंवा मार्ग दाखवितात का ? ज्या हौशी नाट्यसंस्था हे करीत असतील त्यांची वेगळी दखल शासन, तज्ञ आणि समीक्षकांनी घ्यावी, अशी अपेक्षा आहे. हौशी रंगभूमीच्या समस्या, गरजा अनेक आहेत. ही रंगभूमी राज्यभर पसरली आहे. खेड्यापाड्यातून, झोपडपट्टीतून अनेक नाटके सादर होताना दिसतात. ह्या मंडळींना व्यवस्थित प्रशिक्षण मिळाले, व्यवसायाचे प्रशिक्षण मिळाले तर महाराष्ट्राच्या कानाकोप-यात व्यावसायिक नाट्य संस्था उभ्या राहू शकतील. लेखकाच्या चिंतनातून येणारी नाटके महत्वाची .... वास्तव काय आहे ? ह्याचे भान असणा-या हौशी नाट्यमंडळांचा अभ्यास करुन वस्तुस्थितीचे दर्शन कलात्मक दृष्ट्या आपल्या नाटकांतून सादर करु लागल्या तर समाजमनही हादरेल. व्यावसायिक रंगभूमीवरील नाटके काळानुरुप बदलत गेली आहेत. काही अपवाद वगळता मानवाच्या मूलभूत प्रश्नांना सामोरे जाणारी, आजच्या वस्तुस्थितीचे भान वाढविणारी नाटके व्यावसायिक रंगभूमीवर दिसत नाहीत. व्यावसायिक रंगभूमीचा कल, रंजनप्रधान किंवा करमणूक करणा-या नाटकांकडे अधिक दिसतो. त्या प्रकारचे नट, दिग्दर्शक व नेपथ्य दिसू लागते. अर्थात ह्यात त्यांचाही दोष नाही. शेवटी तो व्यवसाय आहे. लूटमार, बलात्कार, महागाई,

शेतक-यांच्या आत्महत्या, मानसिक संघर्ष, विद्रोह, राजकीय उलथा पालथी ह्यांसारखे अनंत प्रश्न. त्यामुळे माणूस त्रस्त होतो म्हणून तो घटकाभर करमणूक करणा-या नाटकांकडे वळतो. पण हाच प्रेक्षक याही अवस्थेत वास्तवाचे भान वाढविणा-या, उपाय सुचविणा-या नाटकांकडे वळला तर वैचारिक गंभीर नाटके व्यावसायिक रंगभूमी निश्चित देईल. पण तो वळला तर ? अन्यथा व्यावसायिक रंगभूमीचे अर्थशास्त्र बदलेल.

अडचणी सोसूनही आव्हाने न टाळता प्रश्नांना सामोरी जाणारी प्रायोगिक रंगभूमी कालप्रमाणे आज जोमात दिसत नाही. तरीही आज नव्या पिढीतील अभ्यासू नाट्यलेखक व दिग्दर्शक सातत्याने चाकोरीबाहेर असणा-या संहिता लिहीत व सादर करीत आहेत. ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणावी लागेल. तीच गोष्ट समांतर रंगभूमीची. काही प्रश्न घेऊन ही रंगभूमी निश्चित चांगली वाट शोधते आहे. पण तीही आज कुठेतरी हरवल्यासारखी वाटते. बोलपटांच्या सुरुवातीला १९३० व ३५ च्या कालखंडात जेव्हा रंगभूमीची परिस्थिती वाईट होती त्यावेळी मुंबईच्या गल्लीबोळात गिरणगावची कामगार रंगभूमी आपल्या आनंदासाठी नाटके करीतच होती. पुढे कामगार रंगभूमीला चांगले दिवस आले. नाट्यस्पर्धा आधी कामगार नाट्यस्पर्धा सुरु झाल्या. ह्यातूनही चांगले कलावंत पुढे येऊ लागले (पुणे, मुंबईकडील). पण महाराष्ट्राच्या इतर भागातून फक्त स्पर्धा होऊ लागल्या. कामगारांच्या जीवनावर व त्यांच्या व्यवसाय व समस्यांवर किती नाटके सादर होतात ? या कलावंतांना प्रशिक्षण देणे, कामगारांच्या जीवनानुभवाचा व त्यांच्या समस्यांचा अभ्यास करुन नाटके लिहिणारे नाटककार तयार करणे महत्वाचे ठरेल. मराठी रंगभूमीच्या प्रगतीचा आढावा घेतांना १८४३ व ८४ च्या पुढे काय काय झाले ? रंगभूमीने कशी प्रगती केली ? ह्याचा इतिहास सर्व नाट्यप्रेमींना ठाऊक आहे.

दलित रंगभूमी ही मुळातच प्रसार आणि प्रचाराची रंगभूमी आहे. समाज जागृतीचे भान आणि समाजाचे मन बदलविणारी रंगभूमी आहे. ही रंगभूमी केवळ

एका जाती वा समाजाची नसून नाडल्या गेलेल्या, टाकून दिलेल्या समाजाला जागृत करुन महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज ह्यांच्या तत्वज्ञानाद्वारे ह्या माणसांना जिवंत करणारी रंगभूमी आहे. प्रारंभी विद्रोही वाटणारी ही रंगभूमी आज समन्वयाकडे झुकली असून (दत्ता भगत, प्रेमानंद गज्वी यांची नाटके) ती आज पुरोगामी विचाराकडे वळत असल्याचे दिसते. बोधी रंगभूमीचे कार्य भरत नाट्यशास्त्राच्या अगोदर अश्वघोषाने त्यांच्या नाट्यशास्त्रात लिहिल्या प्रमाणे बोधी रंगभूमी ही ज्ञान देणारी रंगभूमी आहे. अलिकडच्या काळात श्री. प्रेमानंद गज्वी व त्यांचे सहकारी निष्ठेने ते करीत आहेत.

संगीत रंगभूमी ही खरी मराठी रंगभूमीची जननी. गद्य रंगभूमीने आपला संसार संगीत रंगभूमीने करुन ठेवलेल्या भूमीवरच केला. या संगीत रंगभूमीने एक काळ महाराष्ट्र गाजत व जागत ठेवला. आज ती रंगभूमी काही अपवाद वगळता थांबल्यातच जमा आहे. ह्या रंगभूमीला पुनर्जिवित करण्यासाठी काही उपाय माजी नाट्य संमेलनाध्यक्ष सन्माननीय रामदासजी कामत यांनी सुचविले आहेत. त्याचा विचार व्हावा. म्हणजे संगीत रंगभूमी व तिच्या कलावंतांना निश्चित चांगले दिवस येतील, याची खात्री वाटते.

आज भरमसाठ संगीत असलेल्या नाटकांचा काळ जाऊन 'लेकुरे उदंड जालीं', 'घाशीराम कोतवाल', 'तीन पैशांचा तमाशा' या सारखी नूतन संगीत नाटके यावयास लागली व ती प्रेक्षकांना भावली. त्यामुळे कशा प्रकारची संगीत नाटके दिली म्हणजे प्रेक्षक समाधानी होतील याचा विचार व्हावयास हवा. वेगवेगळ्या नाटककारांनी रंगभूमीसाठी वेगवेगळी नाटके लिहिली आहेत व ती मैलाचा दगडही ठरली आहेत. तेंडुलकरांचा 'घाशीराम', खानोलकरांचे 'एक शून्य बाजीराव', रत्नाकर मतकरींचे 'लोककथा ७८', सतीश आळेकर, प्र. ल. मयेकर यांची वेगळ्या भाषेची, धाटणीची नाटके यामुळे रंगभूमीचा खजिना वेगवेगळ्या प्रकारच्या दागिन्यांनी भरला आहे.

महाराष्ट्रातील लोककलांचा विचार करता भटक्या विमुक्त आदिवासींच्या लोककला व त्यांच्या लोककथांचा वापर, काही अपवाद वगळता, आपल्या व्यावसायिक व हौशी किती करतात? किंबहुना त्यांनी या आदिवासी लोककला व लोककथांचा आपल्या संहितातून वापर केला तर ते नाटक रंजक होईल. त्याला ताल, लय व गती येऊन ते प्रेक्षकांच्या मनावर राज्य करील असे वाटते. या संबंधी गोमंतकीय लोककलांचा अभ्यास व वापरही रंगभूमीसाठी उपयुक्त ठरु शकतो असे वाटते. भारताच्या विविध प्रांतातील लोककलांचा अभ्यास करुन त्याचा वापर आपल्या नाटकातून केला गेला व तशा संहिता संशोधक दृष्टी असलेल्या लेखकांकडून लिहिल्या जाऊन त्या सादर झाल्या तर मराठी नाटक ख-या अर्थाने अखिल भारतीय होईल. आज मराठी रंगभूमी साता समुद्रापलीकडे जात आहे. वरील उपाय जर आपल्या रंगभूमीच्या निर्मात्यांनी केला तर मराठी रंगभूमीचे साचलेपण दूर होईल, असे वाटते. शेवटी नाटक हे मानवी संवेदनांचे संशोधन आहे. माणसाच्या संवेदनातूनच नवे नाटक जन्म घेते. व्यावसायिक रंगभूमी जे करु शकणार नाही ते हौशी रंगभूमी करु शकते. वस्तुस्थितीचे वास्तव धाडसाने समाजासमोर नाट्यकलेतून मांडू शकते. रंगभूमीवर काल काय झाले? ह्याचे मंथन करण्यापेक्षा आत्ता व आज काय करता येईल? ह्याचा विचार करुन तसा आचार करावा असे वाटते.

खरं तर आमच्या सर्वच लोककला व विधीकला ह्या पथनाट्येच होत्या. पण आजच्या पथनाट्यात विधीनाट्य नाही, आहे ते समाज प्रबोधन. एखाद्या ज्वलंत प्रश्नावर ते आधारित असते. समाजाचा दृष्टिकोन बदलायचा असेल तर ही पथनाट्ये फार प्रभावी ठरु शकतील. पण प्रश्न पुन्हा सादरीकरणाचा. ह्यात नुसते कलावंत घेऊन चालणार नाही तर समाजाचा सर्वांगीण अभ्यास असणारे विचारी व कल्पक कलावंत ह्यात लागतील. ते आपला मुद्दा सादरीकरणाद्वारे ठोस मांडून समाजमन बदलवू शकतात. पण त्यासाठी चळवळीची गरज आहे.

शेवटी रंगभूमीचे अनेक पदर व प्रवाह प्रेक्षकांपाशी येऊन थांबतात. कारण नाटक हे शेवटी प्रेक्षकांसाठीच असते. नाटक हे वाङ्मय आणि प्रयोग यांनी मिळून बनलेली कला आहे. तिची सखोल चर्चा झाली पाहिजे. पारंपरिकता आणि आधुनिकता यांचा मिलाप झाला तर उत्कृष्ट साहित्य निर्मिती होऊ शकते. पण हे करण्यासाठी कलेसाठी जगणा-या व कलेवर जगणा-या कलावंतांची नितांत आवश्यकता आहे. हे सर्व घडण्यास प्रेक्षकांचा, समाजाचा आणि मुख्यत्वेकरुन शासनाचा जास्तीत जास्त सहभाग असणे अत्यंत महत्वाचे आहे. हे करण्यासाठी माझी शासनाला एक विनंती आहे की, शासनाने नाटक हा विषय शाळा व महाविद्यालयातून किमान एक तासिका तरी ठेवावाच, ज्यामुळे सगळीच मुले जरी नट होऊ शकली नाहीत तरी सुसंस्कृत नागरिक व रसिक श्रोता आणि प्रेक्षक निश्चित होऊ शकतील. ह्यासाठी महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात एकेक नाट्यगृह असावे आणि ह्याच नाट्यगृहात नाट्यप्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली जावी. ह्याची योजना तज्ञ व सांस्कृतिक संचालनायाशी चर्चा करुन ठरविता येईल.

जाता जाता एवढंच म्हणेन की, महाराष्ट्रभर पसरलेली हौशी रंगभूमी ही एकूणच मराठी रंगभूमीचे अंतरंग आहे. - ही रंगभूमी वृध्दिंगत व्हावी, जतन करावी, तिची जोपासना करावी आणि महाराष्ट्रभर पसरलेल्या या हौशी रंगभूमीच्या पसा-याला, शासन, प्रेक्षक आणि परिषदेने नीटपणे सावरावं, अशी अपेक्षा करतो.

ज्या हौशी रंगभूमीच्या कलावंतांसाठी नाट्यगृहे, प्रशिक्षण शिबिरे, नाट्यतंत्रज्ञांची शिबिरे, वगैरे आयोजून त्यांना अद्ययावत करायचे आहे. - पर्यायाने त्यांच्यावरही ही हौशी रंगभूमी जतन व समृध्द करण्याची जबाबदारी आहे. त्यासाठी त्यांना अभ्यास करायचा आहे, रंगभूमीवर कलावंत म्हणून ताठपणे उभे राहण्याचा ध्यास घ्यावयाचा आहे, परिश्रम करावयाचे आहेत. मिळालेल्या भूमिकेचे अंतरंग तपासून, निरीक्षण करुन व संपूर्ण संहिता नीट वाचून - अभ्यासून आपली भूमिका नुसतीच करायची नाही, तर ठामपणे एकचित्ताने

प्रेक्षकांच्या हृदयात शिरायचं आहे. त्यांच्या मन व बुध्दीला आपल्या जिवंत भूमिकेने स्पर्श करायचा आहे. या अभ्यासू पध्दतीने ते गेले तर गावोगावी त्यांची नाटके प्रेक्षकांना आवडू लागतील व त्यामुळे त्या त्या गावी प्रेक्षकांची अभिरुची व नाटकाबद्दलचे प्रेम वाढू लागेल आणि मग आपल्या जवळ असलेल्या कलावंताच्या चमूसाठी अभ्यासू व चांगल्या लेखकांकडून, चांगल्या संहिता लिहून घेऊन, उत्कृष्ट नाटके या हौशी मंडळ्या सादर करु शकतील आणि मग यातूनच हळूहळू मुंबई पुण्याप्रमाणे तुम्ही आपल्या गावी व प्रदेशात व्यावसायिक रंगभूमी निर्माण करु शकाल, यात शंका नाही.

शेवटी समाजरत्नांची खाण, महाराष्ट्राची शान, सामाजिक परिवर्तनाचे भान आणि निसर्गाचे अमूल्य वरदान असलेल्या हिरव्याकंच अशा कोकणात, त्यातही रत्नागिरी येथे ९१ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संम्मेलनासाठी आलेल्या सर्व नाट्यप्रेमी, नाट्यधर्मी, रंगकर्मीचं, सागराच्या साक्षीने मनापासून स्वागत करतो. या संमेलनात तीन दिवस चालणा-या प्रत्येक नाट्यविषयक उपक्रमांचा आस्वाद घेऊन मराठी रंगभूमीला समृध्द करा, अशी विनंती करतो. या नाट्यसंमेलनात क्षणोक्षणी मिळणा-या नाट्यानंदाने तृप्त होऊन आपण संमेलनाचा निरोप घ्याल आणि परततांना संमेलन आयोजकांना व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेला व शाखेला या तीन दिवसांत संमेलनासाठी मन:पूर्वक सहकार्य कराल, असा विश्वास व आशा बाळगून विनम्रतेने आपला निरोप घेतो.

धन्यवाद!

राम जाधव,

अध्यक्ष

९१ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन, रत्नागिरी.